महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/माप/ 3441
दि ०५/०१/२०२६

प्रति,

मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग अमरावती.

**विषय** :- फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) परीक्षेस प्रविष्ट विदयार्थ्यांच्या शास्त्रीय कला,चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-७/४६१०,दि.२४/१२/२०२५ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ट विदयार्थ्यांच्या शास्त्रीय कला,चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याबाबतचे पत्र सोबत जोडलेले आहे. सदरच्या पत्रास आपल्या कार्यक्षेतील वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी.

आपली विश्वासू

05-01-2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहा.सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र** :- रा.म.पुणे यांचे पत्र पृष्ठे -०२

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे
२) शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.
३) मुख्याध्यापक,सर्व मान्यताप्राप्त शाळा अमरावती विभाग अमरावती यांनी सदर बाब शिक्षक, विदयार्थी, पालक व सर्व संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणुन दयावी.

MSBSHS-11015/108/2025-EXM

I/1633812/2025


| Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004. | | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४ | |
|---|---|---|---|

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 I
Email : secretary.stateboard@gmail.com


महत्त्वाचे/तातडीचे /परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/४६१०
पुणे ४११ ००४.
दिनांक- २४/१२/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय**:- फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ**:- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दि.२४/११/२०१७.
२. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.कशिमं/शारेप/सहा/२०२५/१३०० दि.०४ डिसेंबर २०२५.
३. अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघ, जळगांव, ता.जि.जळगांव.यांचे पत्र दि.०८/१२/२०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून कळविण्यात येते की, संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येते. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ५ मध्ये याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिडीएट ड्रॉइंग ग्रेड) परीक्षा २०२५ चा निकाल जानेवारी २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळांकडे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षापुरतीच देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारीत अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | शाळांनी विभागीय मंडळांकडे प्रस्ताव सादर करणे | दि. १५ जानेवारी २०२६ | दि. ३१ जानेवारी २०२६ |

तरी उपरोक्तनुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरून याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

Digitally signed by
Dipak Ambadas Mali
Date: 30-12-2025
15:51:26
(सचिव)
राज्यमंडळ, पुणे – ०४.

**प्रत माहितीस्तव सादर,**

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१.
३. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३०.
४. मा. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई –०१.
५. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई – ०१.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –**

१. अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघ, जळगांव, ता. जि. जळगांव
२. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.